## स्वच्छ नोटांचे धोरण : आर बी आय

## डिसेंबर ५, २००२

श्री. वेपा कामेसन, डेप्युटी गव्हर्नर, रिझर्व बँक, यांनी बँकांना आग्रहपूर्वक सांगितले, की चलनी नोटांचे आयुष्यमान वाढावे म्हणून त्यांनी नोव्हेंबर २००१ पासून रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या सूचना अमलात आणव्यात व त्यानुसार नोटांच्या गड्डयांना पिना मारण्याचे थांबवून, गड्डे कागदी अगर पॉलिथिनच्या बँड्स मध्ये बांधावेत. रिझर्व्ह बँकेचे स्वच्छ नोटांचे धोरण राबवण्यासंबंधीच्या बाबींबद्दल चर्चा करण्यासाठी, त्यांनी दिल्ली मध्ये करन्सी चेस्ट असलेल्या सरकारी क्षेत्रातील व इतर बँकांच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांची आज बैठक घेतली. एकीकडे खराब नोटा चलनातून परत घेत नागरिकांना चांगल्या दर्जाच्या नोटा व नाणी पूरविणे, हे रिझर्व बँकेच्या स्वच्छ नोटांच्या धोरणाचे उद्दिष्ट आहे. तसेच रिझर्व्ह बँकेने बँकांना सूचना केल्या आहेत, की त्यांनी काऊंटर्सवर मिळालेल्या खराब नोटा परत देणे टाळावे व जनतेला फक्त चांगल्या दर्जाच्या स्वच्छ नोटा द्याव्यात. रिझर्व्ह बँकेने आपल्या चलनी नोटांचे व्यवहार करणाऱ्या सर्व कार्यालयांमध्ये जलद काम करणारी करन्सी व्हेरिफिकेशन अँड प्रोसेसिंग सिस्टिम्स (सीव्हीपीएस) यंत्रे बसविली आहेत. ही यंत्रे दर ताशी ५०,०००-६०,००० नोटा तपासू शकतात व खराव नोटांचे तुकडे करुन ऑन-लाईन विटा केल्या जातात.

१९९९ मध्ये गव्हर्नररांनी स्वच्छ नोटांचे धोरण जाहीर केल्यापासूनच, चलनी नोटा व नाण्यांचा पुरवठा वाढविण्यासाठी बरेच उपाय करण्यात आले. जनतेला नोटांवर काही न लिहिण्याचे आवाहन करण्यात आले व बँकांना खराब व फाटलेल्या नोटा बदलून देण्याच्या अनिर्बंध सोयी पुरविण्यास सांगण्यात आले. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार, करन्सी चेस्ट असलेल्या शाखांनी ग्राहक नसलेल्या व्यक्तींनासुद्धा, खराब व फाटलेल्या नोटांच्या बदली, चांगल्या दर्जाच्या नोटा व नाणी दिली पाहिजेत. मात्र, या सूचना पूर्णपणे पाळल्याजात नाहीत अशा तक्रारी जनतेकडून व व्यापारी संघटनांकडून येतच आहेत.

काही निर्बंधकारक प्रकार चालले असल्याच्या तक्रारी ही आल्या, की करन्सी चेस्ट असलेल्या काही ग्रामीण व अर्धशहरी भागातील बँक शाखा, छोट्या मूल्यांच्या नोटा स्वीकारत नाहीत. ही परिस्थिती कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने या करन्सी चेस्ट शाखांना, नाण्यांच्या वितरणाची ठराविक मासिक उद्दिष्टे ठरवून दिली आहेत. या उद्दिष्टांवर रिझर्व्ह बँक, फीडबॅक अहवालांद्वारे नजर ठेवते. त्या खेरीज प्रायोगिक तत्वावर रिझर्व्ह बँकेने या वर्षी सप्टेंबर व व नोव्हेंबर दरम्यान निवडक ठिकाणी दर महिन्यात एका रविवारी एक करन्सी चेस्ट शाखा केवळ नोटांची अदलाबदल, छोट्या नाण्यांचे वितरण व खराब नोटा काढून घेण्यासाठी उघडी ठेवण्याची विनंती बँकांना केली होती. बँकांकडून आलेल्या वृत्तांतांमधून असे दिसते, की या प्रयोगाला जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे असे ठरवण्यात आले आहे की, बँकांनी ही व्यवस्था पूर्ण सहभागानिशी कायम स्वरुपी सुरु ठेवावी. केंद्राची च महिन्याची निवड प्रत्येक बँकेने करावी.

डेप्युटी गव्हर्नरांनी भर देऊन सांगितले, की करन्सी चेस्ट असलेल्या व करन्सी चेस्ट नसलेल्या

शाखांदरम्यान, उच्च समन्वयाची आवश्यकता आहे, आणि आता अशी वेळ आली आहे की करन्सी चेस्ट शाखांनी बँकींग यंत्रांव्यतिरिक्त छोटी डेस्क टॉप पद्धतीची यंत्रे बसवून त्यांच्या कामाचे यांत्रिकीकरण करावे, म्हणजे जनतेला पिना नसलेल्या चांगल्या दर्जाच्या नोटा मिळतील व रिझर्व बँकेलाही पिना नसलेल्या खराब नोटा प्रक्रिया करुन नष्ट करण्यासाठी मिळतील. त्यांनी असेही सांगितले, की नोटा व नाण्यांच्या भरण्यासंबंधी योग्य समन्वयासाठी रिझर्व्ह बँकेच्या रिजनल डायरेक्टर्सशी संपर्क साधला जाऊ शकतो. त्यांनी आशा व्यक्त केली की, बँका रिझर्व्ह बँकेला स्वच्छ नोटांच्या धोरणाच्या अंमत बजावणीसाठी पूर्ण सहकार्य करतील, आणि तिला या कामासाठी कोणत्याही वैधानिक हस्तक्षेपाचा विचार करावा लागणार नाही.

**अल्पना किल्लावाला**

**महा व्यवस्थापक**

प्रेस रिलीज : २००२-२००३ / ५८९